# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)**

## (राष्ट्रीय सेवा योजना)



**डॉ. श्याम खंडारे**
**संचालक**
**मो. क्र. ७०२०४८२४४३**

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५
web: www.unigug.org
Email: nssdsw.gug@gmail.com


जा.क्र. गो.वि./रासेयो/ 41 /२०२४ दि. 30 / 01 /२०२४

**प्रति,**

**मा. प्राचार्य//रासेयो समन्वयक व कार्यक्रम अधिकारी,**
**संलग्नीत सर्व रायेयो महाविद्यालये,**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

**विषय - विद्यार्थ्यांमध्ये निवडणूक साक्षरता व्हावी याकरीता भारत निवडणूक आयोग आणि शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य कराराच्या अनुषंगाने विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालये यांच्या स्तरावरुन करावयाची कार्यवाहीबाबत.**

**संदर्भ** - उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र. E:७२०३५९, संकिर्ण-२०२४/प्र.क्र.०३/विशि-३, दि. २४ जानेवारी, २०२४

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय शासन परिपत्रकाच्या अनुषंगांने आपणांस कळविण्यात येते की, आगामी सार्वत्रिक निवडणूक, २०२४ च्या अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये निवडणूक साक्षरता व्हावी याकरीता भारत निवडणूक आयोग आणि शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांच्यामधे सांमजस्य करार झाला आहे. सदर करारानुसार गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संलग्नीत सर्व रासेयो महाविद्यालयांनी सदर परिपत्रकामध्ये नमूद मुद्यांच्या अनुषंगाने अनुपालन करावे,

धन्यवाद!

**संलग्न - वरिलप्रमाणे**

**(डॉ. श्याम खंडारे)**
**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

विद्यार्थ्यांमध्ये निवडणूक साक्षरता व्हावी याकरीता भारत निवडणूक आयोग आणि शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य कराराच्या अनुषंगाने सर्व अकृषि विद्यापीठे/ त्यासंलग्नित महाविद्यालये यांच्या स्तरावरुन करावयाची कार्यवाही.

# महाराष्ट्र शासन

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक: E: ७२०३५९ संकिर्ण- २०२४/ प्र.क्र.०३ / विशि-३**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
४ था मजला, मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २४ जानेवारी, २०२४

**वाचाः** १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.संकिर्ण- २०२१/ प्र.क्र.१५३/ विशि-३ दिनांक २३ जुलै, २०२१

२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.संकिर्ण- २०२१/ प्र.क्र.१५३/ विशि-३ दिनांक २२ डिसेंबर, २०२१

३. सचिव, शिक्षण मंत्रालय, उच्च शिक्षा विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. D.O. No. १६-३८/ २०२२- U1A दि.२९ नोव्हेंबर, २०२३

## परिपत्रक

संदर्भाधीन दिनांक २३ जुलै, २०२१ च्या परिपत्रकान्वये भारत निवडणूक आयोगाने पुरस्कृत केलेल्या मतदारांचे पद्धतशीर शिक्षण आणि निवडणूक सहभाग कार्यक्रमांतर्गत ( SVEEP) राज्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये निवडणूक साक्षरता मंडळाची ( ELECTORAL LITERACY CLUB) स्थापना करण्याबाबतची कार्यपद्धती तसेच त्या अंतर्गत घ्यावयाच्या कार्यक्रमांबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच, संदर्भाधीन दि.२२ डिसेंबर, २०२१ च्या परिपत्रकान्वये सर्व अकृषी विद्यापीठे व त्याशी संलग्न महाविद्यालयांमध्ये, अभिमत विद्यापीठे, स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे व तत्सम शैक्षणिक संस्थामध्ये दि.२५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिन राबविण्याबाबत आणि त्यानुषंगाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

आगामी सार्वत्रिक निवडणूक, २०२४ च्या अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये निवडणूक साक्षरता व्हावी याकरीता भारत निवडणूक आयोग आणि शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला आहे. सदर करारानुसार खालील मुद्यांच्या अनुषंगाने सर्व अकृषि विद्यापीठे/ त्यासंलग्नित महाविद्यालये यांच्या स्तरावरुन कार्यवाही करण्याच्या सूचना देण्याबाबत संदर्भाधीन दि.२९ नोव्हेंबर, २०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

त्यानुसार, सर्व अकृषि विद्यापीठे त्यांतर्गत संलग्नित महाविद्यालये, स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे यांनी खालीलनमूद मुद्यांच्या अनुषंगाने अनुपालन करावे.

१. महाविद्यालयीन विद्यार्थ्यामध्ये निवडणूक साक्षरता वाढविण्यासाठी विद्यापीठांनी विविध विद्याशाखेतील विद्यार्थ्यांसाठी मतदार शिक्षण व निवडणूक साक्षरतेचे अभ्यासक्रम तयार करुन त्यासाठी आवश्यक ते श्रेयांक देण्यात यावेत.

२. निवडणूक साक्षरतेच्या अनुषंगाने अध्यापन करण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षित करावे.

३. UDISE (युनिफाईड डिस्ट्रीक्ट इन्फॉर्मेशन सिस्टिम फॉर एज्युकेशन), AISHE (ऑल इंडिया सर्व्हे फॉर हायर एज्युकेशन) आणि अन्य डेटाबेस च्या सहाय्याने महाविद्यालयातील १७ वर्ष पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची नोंद घेऊन (१ जानेवारी, १ एप्रिल, १ जुलै आणि १ ऑक्टोबर) या दिवशी आणि मतदार याद्यांच्या वार्षिक अवलोकनावेळी पात्र विद्यार्थ्यांना ऑनलाईन मतदार नोंदणी करण्याच्या अनुषंगाने संस्थात्मक फ्रेमवर्क तयार करणे जेणे करुन वयाचे १८ वर्ष पूर्ण करणा-या विद्यार्थ्यास त्यांचे मतदान ओळखपत्र देण्याचे निवडणूक आयोगाचे उद्दीष्ट पूर्ण होऊ शकेल.

४. नवीन/ भावी मतदारांना देशाच्या निवडणूक व्यवस्थेशी पूर्णपणे परिचित करणे आणि त्यांच्यामध्ये मतदार म्हणून नोंदणी करण्याची आणि प्रत्येक निवडणुकीत उत्कट, माहितीपूर्ण आणि नैतिक पद्धतीने भाग घेण्याची इच्छा निर्माण करणे यासाठी, विद्यार्थ्यांमध्ये मतदार जागृती करण्यासाठी इतर सह-अभ्यासात्मक उपक्रमाच्या अनुषंगाने महाविद्यालयांमध्ये निवडणूक साक्षरता क्लब (Electoral Literacy Club) निर्माण करुन संदर्भ क्र.१ येथील दिनांक २३ जुलै, २०२१ च्या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांचे अनुपालन करावे.

५. इलेक्टोरल लिटरसी क्लब (ELC) चे उपक्रम आयोजित करण्यासाठी नोडल शिक्षकांचे ऑनलाइन/ ऑफलाइन प्रशिक्षण आयोजित करणे आणि ELC उपक्रमांचे नेतृत्व करण्यासाठी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये प्रशिक्षित कॅम्पस ॲम्बेसेडर नियुक्त करणे.

६. निवडणूक साक्षरतेच्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोग (ECI) ने तयार केलेली संप्रेषण सामग्री महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असलेल्या विविध माध्यमांद्वारे प्रसारित करावी.

७. महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांकडून मतदानाची शपथ घेणे, मॉक मतदानाचे आयोजन करणे, EVM-VVPAT यांचे प्रात्यक्षिके, ECI च्या मोबाईल ॲप्सची माहिती, निवडणूक साक्षरतेबाबत स्पर्धा आयोजित करणे असे उपक्रम स्थानिक निवडणूक अधिकारी यांच्या सहकार्याने आयोजित करणे.

८. दि.२५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त व्यापक उपक्रम आयोजित करणे, संदर्भ क्र.२ येथील दिनांक २२ डिसेंबर, २०२१ च्या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांचे अनुपालन करावे आणि निवडणुकीच्या काळात विद्यार्थ्यांद्वारे मतदार जागृती मोहीम हाती घेणे.

९. CEDE (Continuous Electoral and Democracy Education) मध्ये सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना पुढील उच्च शिक्षणासाठी क्रेडीट सिस्टीम तयार करणे.

१०. सर्व महाविद्यालये/ विद्यापीठांमध्ये निवडणूक साक्षरता कार्यक्रमाचे नियमितपणे निरीक्षण करणे, इतर गोष्टींबरोबरच, त्याची उद्दिष्टे पूर्ण करणे आणि सहकार्याचे गैर-राजकीय आणि निःपक्षपाती स्वरूप सुनिश्चित करणे.

११. सुरुवातीच्या दिवसांपासून नैतिक मतदानाच्या पद्धतीचा अवलंब करण्यासाठी आणि विद्यार्थी संघटना स्तरावर मुक्त, निष्पक्ष आणि प्रलोभनमुक्त नैतिक निवडणूका सुनिश्चित करण्यासाठी महाविद्यालये/ विद्यापीठांमध्ये जेथे जेथे विद्यार्थी संघटनांच्या निवडणुका घेतल्या जातात तेथे निवडणूक साक्षरता जागरुकता कार्यक्रम सुरु करावेत.

१२. ज्या महाविद्यालयांमध्ये निवडणूक प्रक्रीया पार पडणार आहे अशा महाविद्यालयांच्या इमारतीमध्ये दिव्यांगासाठी प्रवेशयोग्य स्टँडर्ड रॅम्प (१:१० ग्रेडियंट स्लोप), स्त्री- पुरुष

यांचेसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे आणि सुयोग्य प्रकाश व्यवस्था असेल याची सुनिश्चितता करावी.

१३. वर नमूद केलेल्या कार्यवाहीचा अहवाल, दस्तऐवज, अनुभव आणि यशोगाथा उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय आणि अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे सादर कराव्यात.

सदर उपक्रम राबविताना उच्च शिक्षण संस्थांनी त्या त्या स्तरावर मुख्य निवडणूक अधिकारी (सीईओ), जिल्हा निवडणूक अधिकारी (DEOs), निवडणूक नोंदणी अधिकारी (EROs), आणि बूथ लेव्हल ऑफिसर (BLOs) यांच्या सहकार्याने व समन्वयाने मतदार शिक्षण आणि मतदार नोंदणीमध्ये भाग घ्यावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०१२४१२२७४८२१०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJIT MADHUKARRAO BAWISKAR

Digitally signed by AJIT MADHUKARRAO BAWISKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=deb455609479b6c7f30e7f1f9a8360c0f8600a549d6ea333415e8d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=99EB928028DF71EBDFCD2898E209D499261FEAD42F7D38A3141A869, cn=AJIT MADHUKARRAO
Date: 2024.01.24 12:27:43 +05'30'

(अ. म. बाविस्कर)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई.
५. कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे
६. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे
७. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
८. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. सहसंचालक, उच्च शिक्षण, सर्व विभागीय कार्यालये.
१०. सहसंचालक, तंत्र शिक्षण, सर्व विभागीय कार्यालये.
११. सर्व सह/उप सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. निवड नस्ती (विशि-३) , उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.